ePaper

नेपाळमधील सर्वात खोल तलावाजवळ बर्फाच्छादित भागात 6 भारतीय अडकले

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

चाकणच्या रस्त्यांवर वाहनांचा महापूर

WWW.MAHAENEWS.COM । सोमवार । दि. 02 नोव्हेंबर 2026 । पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

१९८४ च्या शीख हत्याकांडाच्या दिवशी काँग्रेसचे आंदोलन; राहुल गांधींवर भाजपचा संताप!

काँग्रेसचं 'वोट बचाव' VS शिखांच्या वेदना





महाईन्यूज । नवी दिल्ली

देशाच्या राजकारणात एकाच दिवशी दोन महत्त्वाच्या घडामोडींनी लक्ष वेधून घेतले. एकीकडे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडी आघाडीने दिल्लीतील रामलीला मैदानावर निवडणूक आयोगाविरोधात 'व्होट बचाओ, देश बचाओ' मार्च आंदोलन केले. तर दुसरीकडे भारतीय जनता पक्षाच्या वतीने १९८४ मध्ये झालेल्या शीखविरोधी हिंसाचारातील निष्पाप मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पश्चिम दिल्लीत मोर्चा काढण्यात आला. मात्र, या दोन्ही घटनांमुळे सर्वाधिक चर्चेत आला तो म्हणजे १ नोव्हेंबर या तारखेचा राजकीय आणि ऐतिहासिक संदर्भ!

रामलीला मैदानावर राहुल गांधींचे आंदोलन

दुसरीकडे, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडी आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत 'व्होट बचाओ, देश बचाओ' आंदोलन केले. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत (SIR) कथित अनियमितता, मतदारांची नावे वगळली जाणे आणि निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेचा प्रश्न उपस्थित करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका वाड्रा, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, तेजस्वी यादव, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, सुप्रिया सुळे यांच्यासह विविध विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले. या आंदोलनासाठी मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतील, असा आयोजकांचा दावा होता. मात्र, प्रत्यक्ष उपस्थितीवरून राजकीय वाद निर्माण झाला.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून म्हणजे १ नोव्हेंबरला दिल्लीसह देशातील विविध भागांत शीख समुदायाला लक्ष्य करून भीषण हिंसाचार घडवण्यात आला. हजारो निष्पाप शीख बांधवांची निर्घृण हत्या करण्यात आली. घरे, दुकाने जाळण्यात आली, कुटुंबांची वाताहत झाली. महिलांवर अमानवीय अत्याचार झाले. देशाच्या इतिहासातील हा अत्यंत काळा आणि वेदनादायी अध्याय आजही पीडित कुटुंबांच्या स्मृतीत वेदना बनून जिवंत आहे. या हिंसाचारात देशभरात ३,३२५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती केंद्र सरकारने संसदेत दिली होती. त्यापैकी एकट्या दिल्लीतील मृतांची संख्या २,७३३ होती. तत्कालीन काँग्रेस सरकार आणि प्रशासनाच्या भूमिकेवर या हिंसाचारानंतर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. अनेक चौकशा, आयोग आणि न्यायालयीन प्रक्रियांनंतरही पीडित कुटुंबांचा न्यायासाठीचा संघर्ष अनेक वर्षे सुरू राहिला.

अशा संवेदनशील ऐतिहासिक घटनेच्या स्मृतिदिनीच काँग्रेसने रामलीला मैदानावर आंदोलन आयोजित केल्याने भाजपने तीव्र आक्षेप घेतला आहे. १९८४ च्या हत्याकांडातील पीडितांच्या वेदनांचे स्मरण करण्याऐवजी काँग्रेसने त्याच दिवशी राजकीय आंदोलनाला प्राधान्य का दिले, असा सवाल भाजपकडून उपस्थित करण्यात आला. भाजपच्या आरोपानुसार, तत्कालीन काँग्रेस सरकारच्या काळात घडलेल्या शीखविरोधी हत्याकांडाची ऐतिहासिक जबाबदारी आणि त्यासंदर्भातील प्रश्न पुन्हा चर्चेत येऊ नयेत, यासाठीच काँग्रेसने राजकीय आंदोलनाचा मार्ग निवडला का? केवळ सत्तेच्या राजकारणासाठी आणि वर्तमान राजकीय मुद्द्यांच्या आड ऐतिहासिक जबाबदारी झाकण्याचा हा प्रयत्न आहे का, असा सवालही भाजप समर्थकांकडून उपस्थित केला जात आहे.

शीख बांधवांच्या स्मृतींना भाजपचा उजाळा

दरम्यान, भाजपच्या वतीने पश्चिम दिल्लीतील हरीनगर बस डेपो ते तिलक नगर मेट्रो स्थानक असा श्रद्धांजली मोर्चा काढण्यात आला. केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, भाजपचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष हर्ष मल्होत्रा, मंत्री मनजिंदर सिंग सिरसा, ज्येष्ठ वकील एच. एस. फुल्का यांच्यासह अनेक नेते आणि शीख समाजातील नागरिक सहभागी झाले. मोर्चात सहभागी झालेल्यांनी काळ्या पट्ट्या बांधून १९८४ मधील हिंसाचारात प्राण गमावलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी काँग्रेसच्या तत्कालीन सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. काँग्रेसने शीख समाजाची माफी मागावी आणि पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी भाजप नेत्यांनी केली.